**महाराष्ट्र शासन**

# वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक

जुना मुंबई-आग्रा मार्ग, त्र्यंबक नाका, आदिवासी विकास भवन समोर,नाशिक ४२२ ००२
दुरध्वनी क्रमांक (०२५३) २५९७८४५, ई-मेल:- **ccftnashik@mahaforest.gov.in**

**आदेश** **जा.क्र. :-** कक्ष-१/आस्था/एम/प्र.क्र.३१/२५-२६/ **१०४९** /२०२६-२७, **दिनांक:- २४/०७/२०२६**

**विषय:-** वनरक्षक संवर्गातून वनपाल संवर्गात तात्पुरती पदोन्नती व पदस्थापना सन २०२६

नाशिक वनवृत्तातील खाली नमुद केलेल्या वनरक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना वनपाल संवर्गासाठी सुधारित वेतन संरचनेनुसार असलेल्या वेतन मॅट्रीक्स एस-९: २६४००-८३६०० मध्ये खाली नमूद केलेल्या अटींवर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत असून दिनांक २४/०७/२०२६ रोजी आयोजीत केलेल्या नागरी सेवा मंडळाच्या शिफारशींच्या अनुषंगाने, पदस्थापनेचे आदेश प्रशासकीय कारणास्तव खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | वनरक्षकाचे नाव सर्वश्री /श्रीमती | सध्या कार्यरत पद व ठिकाण | पदोन्नतीनंतरचे पद व पदस्थापनेचा विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ललिता काशिनाथ शेखरे | वनरक्षक सामा.वनी. पेठ ३ | वनपाल आदिवासी मालकी बाऱ्हे वनपरिक्षेत्र बाऱ्हे (प्रा) पश्चिम भाग नाशिक | रिक्त पदावर |
| २ | रविराज सुरेश सरवैय्या | कार्यालयीन वनरक्षक वनक्षेत्र ताहाराबाद (प्रा) | वनपाल राहता (नवनिर्मित पद) वनपरिक्षेत्र कोपरगाव (प्रा) अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| ३ | नानाभाऊ विश्वनाथ गायकवाड | वनरक्षक भावडी, वनक्षेत्र मापअ, श्रीगोंदा | वनपाल कर्जत (मापअ) वनपरिक्षेत्र मा.प.अ. रेहकुरी वन्यजीव विभाग पुणे | रिक्त पदावर |
| ४ | प्रिती इंद्रजीत साळवे | वनरक्षक विशेष सेवा, विभागीय कार्यालय अहिल्यानगर वनविभाग | वनपाल सामा.वनी. राहुरी २ परिक्षेत्र सामा.वनी. राहुरी सामा. वनी. विभाग, अहिल्यानगर | रिक्त पदावर |
| ५ | रुपाली भगवान मोरे | वनरक्षक, मोडाळे, वनक्षेत्र इगतपुरी प्रा. | वनपाल सामा. वनी. कळवण २, परिक्षेत्र सामा. वनी. कळवण सामा. वनी. विभाग, नाशिक | रिक्त पदावर |
| ६ | नारायण अंबादास दराडे | नेवासा वनक्षेत्र वन्यजीव पैठण | वनपाल जामखेड वनपरिक्षेत्र कर्जत (प्रा) अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| ७ | राहूल बाळासाहेब बच्छाव | वनरक्षक डांगसौदाणे वनक्षेत्र सटाणा (प्रा) | वनपाल सामा. वनी. मालेगाव १, परिक्षेत्र सामा. वनी. मालेगाव सामा. वनी. विभाग, नाशिक | रिक्त पदावर |
| ८ | आण्णा वाल्मिक लोखंडे | वनरक्षक सामा.वनी. चांदवड २ | वनपाल सामा. वनी. श्रीरामपूर १ परिक्षेत्र सामा. वनी. श्रीरामपूर सामा. वनी. विभाग, अहिल्यानगर | रिक्त पदावर |
| ९ | माणिक माधव साळुंके | वनरक्षक सामा.वनी. बागलाण १ | वनपाल सामा. वनी. राहता २ परिक्षेत्र सामा. वनी. राहता सामा. वनी. विभाग, अहिल्यानगर | रिक्त पदावर |
| १० | राहुल भगवंत घाटेसाव | वनरक्षक, त्रिंगलवाडी, वनक्षेत्र-इगतपुरी प्रा. | वनपाल गुंडेगाव वनपरिक्षेत्र अहिल्यानगर (प्रा) अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| ११ | विजय राजेंद्र थोरात | वनरक्षक, कोसेगव्हाण, वनक्षेत्र मापअ श्रीगोंदा | वनपाल कुळधरण वनपरिक्षेत्र मा.प.अ. रेहकुरी वन्यजीव विभाग पुणे | रिक्त पदावर |

| अ. क्र. | वनरक्षकाचे नाव सर्वश्री /श्रीमती | कार्यरत विभाग | पदोन्नतीनंतरचे पद व पदस्थापनेचा विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १२ | महेश बाजीराव ससे | वनरक्षक वडनेर, वपअ राहुरी प्रा. | वनपाल राहुरी<br>वनपरिक्षेत्र राहुरी (प्रा)<br>अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| १३ | मनोहर सदु गांवडे | वनरक्षक देवसाने, वनक्षेत्र ननाशी प्रा. | वनपाल आदिवासी मालकी बाऱ्हे<br>वनपरिक्षेत्र बाऱ्हे (प्रा)<br>पश्चिम भाग नाशिक | रिक्त पदावर |
| १४ | दत्तात्रय मुरलीधर देवकाते | वनरक्षक ताहाराबाद वनक्षेत्र ताहाराबाद (प्रा) | वनपाल जाखोड रोपवाटीका<br>वनपरिक्षेत्र ताहाराबाद (प्रा)<br>पुर्व भाग नाशिक | रिक्त पदावर |
| १५ | महेश लक्ष्मण सदगिर | वनरक्षक टाहाकारी वपअ अकोले रोहयो | वनपाल देवठाण<br>वनपरिक्षेत्र अकोले (रोहयो)<br>अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| १६ | राधाकिसन नामदेव घोडसरे | वनरक्षक जांभळी वपअ राहुरी प्रा. | वनपाल राजूर<br>वनपरिक्षेत्र राजूर (भवका)<br>अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| १७ | संदिप सयाजी काळे | वनरक्षक सामा.वनी. येवला ३ | वनपाल रगतविहीर<br>वनपरिक्षेत्र उंबरठाण (प्रा)<br>पुर्व भाग नाशिक | रिक्त पदावर |
| १८ | उमेश पोपटराव खराडे | वनरक्षक, कर्जत वनक्षेत्र मापअ, रेहेकुरी | वनपाल भाळवणी<br>वनपरिक्षेत्र पारनेर (प्रा)<br>अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| १९ | सुचित्रा रमेश कुवर | वनरक्षक, देवरगांव, वनक्षेत्र-नाशिक प्रा. | वनपाल सामा. वनी. बागलाण १<br>परिक्षेत्र सामा. वनी. बागलाण<br>सामा. वनी. विभाग, नाशिक् | रिक्त पदावर |
| २० | सुरेश पांडूरंग चौरे | वनरक्षक जाखोड रोपवाटीका वनक्षेत्र ताहाराबाद (प्रा) | वनपाल रेस्क्यु टिम राहुरी<br>वनपरिक्षेत्र राहुरी (प्रा)<br>अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| २१ | संतोष माधव पारधी | वनरक्षक मालदाड, वनअ संगमनेर भाग-२ | वनपाल पेमगिरी<br>वनपरिक्षेत्र संगमनेर १<br>अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| २२ | किसन इरप्पा पवार | वनरक्षक जान्नज वनक्षेत्र जामखेड | वनपाल कर्जत<br>वनपरिक्षेत्र कर्जत (प्रा)<br>अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| २३ | अप्सर बादशाह पठाण | वनरक्षक सुपा, वपअ पारनेर प्रा | वनपाल कानडगाव<br>वनपरिक्षेत्र राहुरी (प्रा)<br>अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| २४ | कृष्णा नाना गायकवाड | वनरक्षक कामरगाव वपअ अहिल्यानगर प्रा | वनपाल सामा. वनी. बेलवंडी<br>परिक्षेत्र सामा. वनी. श्रीगोंदा<br>सामा. वनी. विभाग, अहिल्यानगर | रिक्त पदावर |
| २५ | सय्यद मुस्ताक इस्माईल | वनरक्षक कोपरगाव २ वनक्षेत्र कोपरगाव | वनपाल चिचोंडी<br>वनपरिक्षेत्र तिसगाव (रोहयो)<br>अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| २६ | सचिन लहानु शिंदे | वनरक्षक वडगांव तनपुरा वनक्षेत्र मापअ रेहेकुरी | वनपाल फिरते पथक अहिल्यानगर<br>वनपरिक्षेत्र अहिल्यानगर (प्रा)<br>अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| २७ | धनश्री तुकाराम रोकडे | वनरक्षक सामा.वनी. त्र्यंबक १ | वनपाल कार्यआयोजना नाशिक<br>कार्यआयोजना विभाग नाशिक | रिक्त पदावर |
| २८ | बहिरु काळू बेनके | वनरक्षक पिंपळगाखांड वपअ अकोले प्रा | वनपाल सामा. वनी. श्रीरामपूर २<br>परिक्षेत्र सामा. वनी. श्रीरामपूर<br>सामा. वनी. विभाग, अहिल्यानगर | रिक्त पदावर |

| अ. क्र. | वनरक्षकाचे नाव सर्वश्री /श्रीमती | कार्यरत विभाग | पदोन्नतीनंतरचे पद व पदस्थापनेचा विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| २९ | रुबिनाबानो हमिदखान पठाण | वनरक्षक सामा.वनी. मालेगाव १ | वनपाल सामा. वनी. पारनेर २ परिक्षेत्र सामा. वनी. पारनेर सामा. वनी. विभाग, अहिल्यानगर | रिक्त पदावर |
| ३० | खडकसिंग गंगाराम पाल | वनरक्षक मोक भणगी वनक्षेत्र कळवण (प्रा) | वनपाल सामा. वनी. पारनेर १ परिक्षेत्र सामा. वनी. पारनेर सामा. वनी. विभाग, अहिल्यानगर | रिक्त पदावर |
| ३१ | भगवान खंडु गोवेकर | वनरक्षक कुपखेडा वनक्षेत्र सटाणा (प्रा) | वनपाल म्हसरूळ वनपरिक्षेत्र नाशिक (प्रा) पश्चिम भाग नाशिक | रिक्त पदावर |
| ३२ | सुरैय्या इस्माईल शेख | पिंपळवाडी वनक्षेत्र वन्यजीव पैठण | वनपाल दहिफळ वनपरिक्षेत्र वन्यजीव पैठण वन्यजीव विभाग छत्रपती संभाजीनगर | रिक्त पदावर |
| ३३ | निलेश रमेश सरवदे | वनरक्षक सामा.वनी. ईगतपूरी ३ | वनपाल पैठण वनपरिक्षेत्र वन्यजीव पैठण वन्यजीव विभाग छत्रपती संभाजीनगर | रिक्त पदावर |
| ३४ | श्रध्दा सखाहरी पडवळ | वनरक्षक कुंभारी वपअ कोपरगाव प्रा | वनपाल सामा. वनी. कोपरगाव १ परिक्षेत्र सामा. वनी. कोपरगाव सामा. वनी. विभाग, अहिल्यानगर | रिक्त पदावर |
| ३५ | हिनाली रामचंद्र सोनवणे | वनरक्षक, पाथर्डी, वनक्षेत्र-नाशिक प्रा. | वनपाल कार्यआयोजना नाशिक कार्यआयोजना विभाग नाशिक | रिक्त पदावर |
| ३६ | राजश्री मोहन दिघे | वनरक्षक पेमगिरी वपअ संगमनेर भाग १ | वनपाल रेस्क्यु टिम संगमनेर १ वनपरिक्षेत्र संगमनेर भाग १ अहिल्यानगर वनविभाग | रिक्त पदावर |
| ३७ | सुनिता सतिष देशमुख | वनरक्षक सामा.वनी. नाशिक- १ | वनपाल खैरगाव वनपरिक्षेत्र ईगतपुरी (प्रा) पश्चिम भाग नाशिक | रिक्त पदावर |
| ३८ | सोमनाथ खंडू अहिरे | आगार रक्षक वणी, वनक्षेत्र दिंडोरी (प्रा) | वनपाल फिरते पथक नाशिक वनपरिक्षेत्र नाशिक (प्रा) पश्चिम भाग नाशिक | रिक्त पदावर |
| ३९ | ममता केशव बोडके | वनरक्षक आव्हाटी वनक्षेत्र सटाणा (प्रा) | वनपाल कुशेगाव वनपरिक्षेत्र ईगतपुरी (प्रा) पश्चिम भाग नाशिक | रिक्त पदावर |
| ४० | पुनम रघुनाथ साळवे | वनरक्षक मेसनखेडा वनक्षेत्र चांदवड (प्रा) | वनपाल अतिक्रमण पार्टी सिन्नर वनपरिक्षेत्र सिन्नर (प्रा) पश्चिम भाग नाशिक | रिक्त पदावर |
| ४१ | गोपाळ राजाराम हरगावकर | वनरक्षक ममदापूर वनक्षेत्र येवला (प्रा) | वनपाल सामा. वनी. चांदवड १ परिक्षेत्र सामा. वनी. चांदवड सामा. वनी. विभाग, नाशिक | रिक्त पदावर |
| ४२ | सोनाली सर्जेराव वाघ | वनरक्षक विसापूर वनक्षेत्र येवला (प्रा) | वनपाल सामा. वनी. जामखेड परिक्षेत्र सामा. वनी. जामखेड सामा. वनी. विभाग, अहिल्यानगर | रिक्त पदावर |
| ४३ | किशोरी बाळासाहेब सानप | वनरक्षक सामा.वनी. चांदवड - १ | वनपाल विशेष सेवा विभागीय कार्यालय अहिल्यानगर वनविभाग अहिल्यानगर | रिक्त पदावर |
| ४४ | मिनाक्षी सखाराम खेमनर | वनरक्षक संगमनेर १ वनक्षेत्र संगमनेर | वनपाल सामा. वनी. संगमनेर २ परिक्षेत्र सामा. वनी. संगमनेर सामा. वनी. विभाग, अहिल्यानगर | रिक्त पदावर |

वर नमूद केलेल्या वनरक्षकांना पदोन्नती कोट्यातील रिक्त असलेल्या पदावर वनपाल संवर्गात केवळ तात्पुरती पदोन्नती पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

१. मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-विधी-३१/ विधी/१८३/२६-२, दिनांक १८/०५/२०२६ अन्वये दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने वरील वनरक्षकांना देण्यात येणारी तात्पुरती पदोन्नती ही नाशिक वनवृत्तात आंतरवृत्तीय बदलीने हजर झालेल्या वनरक्षकांनी ज्येष्ठतेबाबत **मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल' केलेल्या तसेच इतर न्यायालयांमध्ये प्रकरणी दाखल न्यायालयीन प्रकरणांच्या अंतिम निर्णयाचे अधिन राहून देण्यात येत आहे.**

२. सदर पदोन्नती केवळ तात्पुरती स्वरुपाची असल्याने कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता पदावनत करण्यात येईल. तसेच सदर पदोन्नती नियमित होईपर्यंत अशा पदोन्नत वनपालांना सेवा ज्येष्ठतेसाठी हक्क सांगता येणार नाही.

३. उपरोक्त वनरक्षक यांना शासन, वित्त विभाग, निर्णय क्रमांक वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दिनांक ०२-०३-२०१९ अन्वये, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ लागू करण्यात आला आहे. त्यांनी पदोन्नतीचे पदावर जाणेस नकार दर्शविला तर त्यांना लागू केलेले सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ उक्त दिनांक ०२-०३-२०१९ मधील तरतुदीनुसार काढून घेण्यात येतील.

४. या आदेशाव्दारे पदोन्नत करण्यात आलेले वनरक्षक ज्या दिनांकास पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होतील त्या दिनांकास त्यांची पदोन्नतीचे पदावर वेतननिश्चिती करण्यात येईल. तथापि, ज्या वनरक्षकांना कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वनपाल या संवर्गाची वरिष्ठ वेतनश्रेणी, यापूर्वीच लागू करण्यात आली असेल, अशा वनरक्षकांची पुन्हा वेतननिश्चिती करण्यात येणार नाही.

५. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१८/प्रक्र.३६६/१६ब दिनांक ०७-०५-२०२१ चे अनुषंगाने, पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदांवर सेवाज्येष्ठतेने तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या तसेच या संबंधाने इतर याचिकांच्या अधिन राहून तात्पुरती पदोन्नती देण्यात आली आहे.

६. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक ०२-०६-२०१४ अन्वये त्या त्या वर्षाची वार्षिक मालमत्ता विवरणपत्रे सादर केली असणे ही राज्य शासनामधील सर्व टप्प्यांवरील पदोन्नती, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गतच्या पदोन्नती, प्रतिनियुक्ती, विदेश दौरा यासाठी पूर्व अट म्हणून विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील सूचनांनुसार **उपरोक्त वनरक्षकांकडून आधी दिनांक ३१-०३-२०२६ रोजीचे मालमत्ता विवरणपत्र प्राप्त करुन घेतल्याची खात्री करुनच पुढील आदेश निर्गमित करण्याची दक्षता संबंधित कार्यालय प्रमुखांनी घ्यावयाची आहे.**

७. कार्यालय प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी पदोन्नतीकामी सादर केलेल्या माहितीच्या आधारे वरील वनरक्षक यांना पदोन्नती देण्यात आलेली असून त्यांचे मुळ दस्तऐवजांवरून खात्री करावी तसेच हे आदेश निर्गमित होईपावेतो एखाद्या कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित असल्यास फौजदारी/न्यायालयीन प्रकरण व निलंबन असल्यास त्यांचे पुढील पदोन्नतीचे आदेश न काढता याबाबत या कार्यालयास तात्काळ अवगत करावे.

८. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२, दिनांक १२ सप्टेंबर २०१६ अन्वये, वरच्या संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर पदोन्नती नाकारणाऱ्या कर्मचाऱ्याचे नाव निवड यादीतून काढून टाकण्यात येईल व पुढील २ वर्षे होणाऱ्या निवड सूचीमध्ये संबंधित कर्मचाऱ्याचा विचार करण्यात येणार नाही.

९. संबंधितांकडून वर नमुद केलेल्या अटी मान्य असल्याबाबत बंधपत्र प्राप्त करुन घेवून त्यांचे सेवापुस्तकास लावण्यात यावे.

१०. पदोन्नतीने पदस्थापना ही संपूर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे कोणत्याही कर्मचाऱ्याने पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणेबाबत राजकीय दबाव आणल्यास त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम क्रमांक २३ चा भंग केला असे समजून सदर कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहिल याची संबंधितांना जाणीव करुन देण्यात यावी.

११. सदर कर्मचारी यांची पदोन्नती ५०-५५ किंवा ३० वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर पुर्नविलोकनाच्या निर्णयाच्या अधीन राहील.

१२. पदोन्नत झालेल्या उपरोक्त वनरक्षक यांना स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करण्याची संबंधित कार्यालय प्रमुखांनी दक्षता घ्यावयाची आहे. उक्त वनरक्षकांना वेळीच कार्यमुक्त करणेस दिरंगाई केल्यास व याबाबत भविष्यात काही पेचप्रसंग निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखांची राहील. उपरोक्त वनरक्षकांना कार्यमुक्त केल्याचा व ते त्यांचे पदोन्नतीचे ठिकाणी हजर झालेबाबतचे अहवाल या कार्यालयास यथाशिघ्र सादर करावा.

१३. **मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-विधी-३१/विधी/१८३/२६-२, दिनांक १८/०५/२०२६ अन्वये प्राप्त मार्गदर्शनानुसार सदर पदोन्नती या मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण तसेच मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल याचिकांच्या अंतिम निर्णयाचे अधिन राहूनच देण्यात येत आहेत, याची नोंद घ्यावी.**

वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक

गजेंद्र हिरे (भा.व.से.)
**वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**नाशिक**

**प्रति,**

वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, नाशिक
उपवनसंरक्षक, पुर्व भाग/ पश्चिम भाग नाशिक/ अहिल्यानगर/ कार्यआयोजना नाशिक/वन्यजीव नाशिक/ पुणे
विभागीय वन अधिकारी, सामा. वनी. नाशिक/अहिल्यानगर/मुल्यांकन, नाशिक/(वन्यजीव) छ.संभाजीनगर
वनजमाबंदी अधिकारी, नाशिक

**प्रतिलिपी:-** अपर प्रधान मुख्य वनंसरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) म.रा. नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
**प्रतिलिपी:-** अपर प्रधान मुख्य वनंसरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
**प्रतिलिपी:-** प्रशासकीय अधिकारी, वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक यांचे कार्यालय यांना माहितीस्तव रवाना.

गजेंद्र हिरे (भा.व.से.)
**वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**नाशिक**